# ज्ञानयोग

**स्वामी विवेकानंद**

अनुवाद

**उज्ज्वला केळकर**


**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**ज्ञानयोग :** स्वामी विवेकानंद
अनुवाद : उज्ज्वला केळकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
उज्ज्वला केळकर
१७६/२, 'गायत्री' प्लॉट नं.-१२
वसंतदादा साखर कामगार भवनजवळ, सांगली ४१६४१६
फोन नं. ०२३३-२३१००२० मो. नं. : ९४०३३१०१७०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३१०/-

# अनुक्रमणिका


| प्रकरण | शीर्षक | | |
|---|---|---|---|
| १. | धर्माची आवश्यकता | ............ | ५ |
| २. | मानवाचे यथार्थ स्वरूप | ............ | १८ |
| ३. | माया आणि भ्रम | ............ | ३८ |
| ४. | माया आणि ईश्वर-धारणेचा क्रमविकास | ............ | ५७ |
| ५. | माया आणि मुक्ती | ............ | ७२ |
| ६. | ब्रह्म आणि जगत् | ............ | ८५ |
| ७. | सर्वांभूती भगवंताचे दर्शन | ............ | १०२ |
| ८. | आत्मसाक्षात्कार | ............ | ११४ |
| ९. | बहुत्वात एकत्व | ............ | १३७ |
| १०. | आत्म्याचा मुक्त स्वभाव | ............ | १५३ |
| ११. | विश्व बहिर्जगत | ............ | १६८ |
| १२. | विश्व-अंतर्जगत | ............ | १७९ |
| १३. | अमरत्व | ............ | १९५ |
| १४. | आत्मा | ............ | २०८ |
| १५. | आत्मा : त्याचे बंधन आणि मुक्ती | ............ | २२४ |
| १६. | मानवाचे सत्य आणि आभासमय स्वरूप | ............ | २३२ |


✦✦✦



**प्रकरण १**

# धर्माची आवश्यकता

## (लंडन येथे दिलेले व्याख्यान)

**पृ.** ७ मानव-जातीच्या भवितव्याच्या निर्माणात या विविध शक्तींनी योगदान दिलंय आणि देत आहेत, त्या साऱ्यांमध्ये धर्माची शक्ती अधिक प्रबल असलेली दिसून येते. सर्वच समाजांच्या मुळाशी कुठे न कुठे तरी ही अद्‌भुत शक्ती काम करते. मानवी घटकांना एकत्र आणणारी, त्यांना एकतेच्या सूत्रात गोवणारी, आजपर्यंतची सगळ्यात मोठी प्रेरक शक्ती म्हणजे हा धर्मच होय. या धर्मामुळे निर्माण झालेले संबंध, जातीच्या, भौगोलिक परिस्थितीच्या, फार काय वंशाच्या संबंधापेक्षाही जास्त चिवट असतात. एकाच देवाची पूजा करणारे, एकाच धर्मावर विश्वास ठेवणारे लोक या उत्कटतेने आणि सातत्याने एकमेकांना साथ देतात, तशी साथ एकाच वंशाच्या लोकांमध्येच काय, भावा-भावांमध्येही बघायला मिळत नाही. धर्माचा प्रादुर्भाव कसकसा होत गेला, हे समजून घेण्याचे अनेक प्रयत्न आत्तापर्यंत झाले. आपल्याला आत्तापर्यंतच्या जितक्या प्राचीन धर्माचं ज्ञान आहे, ते सगळे असा दावा करतात की, ते अलौकिक आहेत. जसं काही त्यांचा उगम मानवाच्या मन-बुद्धीतून झालेला नसून त्याचा स्रोत कुठे तरी बाहेर आहे.

धर्माच्या उत्पत्तीविषयी, आधुनिक विद्वानांना पुढील दोन सिद्धांत काहीअंशी ग्राह्य वाटतात. पहिल्या सिद्धांतानुसार आपल्या पूर्वजांच्या पूजेतूनच धर्मभावनेचा विकास झाला. दुसऱ्या सिद्धांतानुसार नैसर्गिक शक्तींना वैयक्तिक रूप देण्यातून धर्माचा प्रारंभ झाला. आपल्या दिवंगत पूर्वजांची स्मृती मनुष्य चिरंतन ठेवू इच्छितो. तो विचार करतो, त्याचं शरीर जरी नष्ट झालं, तरी तो जीवित आहे. या विश्वासानेच तो त्याच्यासाठी खाद्यपदार्थ ठेवतो. एका अर्थाने तो त्यांची पूजाच करतो. माणसाच्या या भावनेतूनच धर्माचा विकास झाला आहे.

**पृ.८** इजिप्त, बॅबिलोनिया, चीन त्याचप्रमाणे अमेरिकेतील काही जातींच्या प्राचीन धर्मांचा अभ्यास केला असता, असं स्पष्टपणे लक्षात येते की, पितर-पूजेतूनच धर्माची उत्पत्ती झाली. प्राचीन इजिप्तमधील लोकांची आत्म्यासंबंधीची धारणा अशी होती की, प्रत्येक मानव शरिरात आणखी एक जीव असतो. तो म्हणजे त्या शरिराचे प्रतिरूपच असते. मनुष्य मेल्यावरही त्याचे हे प्रतिरूप शरीर जिवंत असते. जोपर्यंत ते मृत शरीर जिवंत असते, तोपर्यंत ते प्रतिरूप शरीरही जीवित असते. यामुळेच आपल्याला इजिप्तमध्ये मृत शरीराला सुरक्षित ठेवण्याची प्रथा दिसते. यामुळेच मृत शरीरं सुरक्षितपणे ठेवता यावीत, म्हणून त्यांनी विशाल पिरॅमिडस्‌ची निर्मिती केली. त्यांची धारणा अशी की, मृत शरीराला कुठल्याही प्रकारे हानी पोहोचली, तर व्यक्तिच्या त्या प्रतिरूप शरीरालाही तशाच प्रकारची हानी पोहोचेल. ही धारणा म्हणजे स्पष्टपणे पितर-पूजाच आहे. प्राचीन बॅबिलोनियन लोकांमध्येही प्रतिरूप शरीराबद्दल असेच विचार असलेले दिसून येतात; मात्र काही प्रमाणात ते यापेक्षा वेगळे आहेत. ते असे मानतात की, प्रतिरूप शरीरात स्नेहाचा भाव असत नाही. त्यांचा प्रेतात्मा अन्न-पाणी आणि अन्य जरुरीच्या गोष्टींसाठी अन्य जीवित लोकांना भेडसावत हिंडत असतो. आपली पत्नी, मुले-बाळे यांच्याविषयीही त्यांना प्रेम उरलेले नसते. प्राचीन काळातील हिंदूंमध्येही अशा तऱ्हेच्या पितरांच्या पूजेची उदाहरणे पाहायला मिळतात. चीनमधील लोकांबाबतही असेच म्हणता येईल की, त्यांच्या धर्माचा आधारही पितरांची पूजा हाच आहे आणि आजही या देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पूर्वजपूजा प्रचलित आहे. खरे पाहता चीन देशात कोणता एकमेव धर्म प्रचलित आहे, असं पाहिलं, तर तो केवळ पूर्वज-पूजा हाच धर्म आहे, असं दिसून येईल. अशा तऱ्हेने मृत पूर्वजांच्या पूजेमधून धर्माची उत्पत्ती झाली, असं मत मांडणाऱ्यांचा पक्ष चांगलाच बळकट आहे, असं म्हणता येईल.

**पृ.९** प्राचीन आर्य साहित्याचा आधार घेत, काही विद्वान असे सिद्ध करतात की, धर्माचा उगम निसर्ग पूजेतून झाला. भारतात सर्वत्र पितर - पूजेची उदाहरणे बघायला मिळतात, ही गोष्ट खरी, तथापि, प्राचीन धर्मग्रंथांमधून याबद्दल काहीच लिहिलेले आढळत नाही. आर्यांचा सगळ्यात प्राचीन ग्रंथ ऋग्वेद-संहिता, त्यात याचा मुळीच उल्लेख आढळत नाही. जे आपल्या दृष्टीच्या पल्याड आहे, ते जाणून घेण्यासाठी माणसाचे मन व्याकूळ होते. उषा, संध्या, वादळे, निसर्गाची विराट शक्ती, त्यांचे सौंदर्य, या सगळ्यांनी मानवावर असा काही

प्रभाव टाकलेला आहे की, तो या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन, त्यांचा रहस्यभेद करून, त्यांची गुपिते जाणून घेण्याची आकांक्षा धरू लागला. या प्रयत्नात त्याने या साऱ्या दृश्यांवर चेतनधर्माचा आरोप केला. त्यांना शरीर व आत्मे आहेत, अशी कल्पना केली. कधी त्यात त्याला सौंदर्य दिसले, तर कधी ती इंद्रियातीत आहेत, असे वाटले. त्यांना समजून घेण्याच्या प्रयत्नात, कधी त्यांना मानवी रूप दिले गेले, तर कधी तसे ते दिले गेले नाही; परंतु त्याचे पर्यवसान त्यांना अमूर्त मानण्यातच झाले. प्राचीन ग्रीसमध्येही अशाच तऱ्हेने घडलेले दिसून येईल. त्यांच्या सगळ्या पुराणातून, आख्यानातून अमूर्त प्रकृतिपूजाच असलेली दिसून येते. प्राचीन जर्मन, स्कँडेनेव्हियन आणि इतर सर्व आर्य जातींचेदेखील असेच आहे. अशा तऱ्हेने निसर्गाच्या शक्तींचं मानवीकरण करण्यातून धर्माचा उगम झाला, असे मानणाऱ्यांचा पक्षही प्रबळ आहे.

हे दोन्ही सिद्धांत जरी परस्परविरोधी वाटले, तरी तिसऱ्या एका निराळ्याच भूमीवर, त्यांना एकत्र आणून त्यांचा मेळ घालता येईल, असे मला वाटते. मला असे वाटते की, तेच वास्तविक धर्माचे खरे बीज आहे. त्यालाच मी 'इंद्रियांची सीमा उल्लंघून जाण्याचा प्रयत्न' असे म्हणू इच्छितो. एकीकडे मनुष्य आपल्या पितरांच्या आत्म्याचा शोध घेतो. प्रेतात्म्यांचा शोध घेतो, म्हणजेच शरीर नष्ट झाल्यावरही पुढे काय होते, हे तो जाणून घेऊ इच्छितो. दुसरीकडे निसर्गातील विशाल दृश्यांच्या मागे काम करणारी शक्ती कोणती, हे समजून घेण्याचा प्रयत्न करतो. या दोन्हीही स्थितीत एक गोष्ट नक्की आहे की, मनुष्य केवळ इंद्रियगम्य गोष्टींवर संतुष्ट नाही. तो त्याच्या पलीकडे जाऊ इच्छितो. धर्माची उत्पत्ती कशी झाली, याचे स्पष्टीकरण, गहन किंवा अद्‌भुत असायचे कारण नाही. धर्माची पहिली झलक स्वप्नात मिळाली असणार, ही गोष्ट मला अतिशय स्वाभाविक वाटते. स्वप्नाच्या आधारावरच मनुष्य अमरत्वाची कल्पना करू शकतो. स्वप्नाची अवस्था मोठी अद्‌भुत असते. आपल्याला माहीत असते की, लहान मुले व अडाणी लोक स्वप्न आणि जागेपणा यात फारसा फरक वाटत नाही. निद्रावस्थेत तसे पाहिले, तर शरीर मेल्यासारखेच असते, तरीही मनाचे गुंतागुंतीचे व्यवहार चालूच असतात, असा जर तर्क केला, तर त्यात अस्वाभाविक असे काहीच नाही. या आधारेच म्हणता येईल की, शरीर (मृत्यूमुळे) कायमचे नष्ट झाले, तरीसुद्धा आपल्या मनाच्या क्रिया (स्वप्नाप्रमाणेच) तशाच चालू राहतील, असा जर माणसाने निष्कर्ष काढला, तर आश्चर्य वाटायला नको. धर्माच्या

उत्पत्तीसंबंधीच्या गुढाचे, हे अधिक स्वाभाविक स्पष्टीकरण म्हणता येईल, असे मला वाटते. या स्वप्नांच्या अनुशीलनातून मानवी मन, अधिकाधिक उच्च धारणेचा क्रमशः विकास करत उच्च विचारापर्यंत पोहोचले असेल. अर्थात, हीही गोष्ट खरी की, स्वप्नांमधल्या गोष्टी जागृतावस्थेत खऱ्या ठरत नाहीत आणि स्वप्नावस्थेत माणसाला काही नवीन अस्तित्त्व प्राप्त होते, असेही नाही. त्याच्या जागृतावस्थेतील अनुभवांची स्वप्नात नुसती उजळणी होते.

**पृ.१०** परंतु एव्हाना अन्वेषणास प्रारंभ झाला होता. या अन्वेषणाचे क्षेत्र आत होते. अंतर्जगत हेच त्याचे क्षेत्र होते. मनाच्या भिन्न भिन्न अवस्थांचा धांडोळा घेत, माणूस अधिकाधिक खोल खोल जात राहिला आणि या अन्वेषणात, त्याने जागृत व स्वप्न या दोन्ही अवस्थांच्या वरची अवस्था शोधून काढली. या अवस्थेचा उल्लेख जगातील सर्वच सुसंघटित धर्मांनी केलेला आपल्याला आढळून येतो. तिला ते समाधी, परमानंदाची अवस्था, अंतःस्फूर्तीने लाभलेली अवस्था वगैरे नावे देतात. सर्वच सुसंघटित धर्म अशी घोषणा करतात की, त्यांचे प्रवर्तक, त्यांचे द्रष्टे, त्यांचे आचार्य मनाच्या अशा अवस्थेपर्यंत पोहोचले होते की, जागृती नाही वा स्वप्नही नाही, तर ती अवस्था त्या उभयतांच्या पलीकडची असून त्या अवस्थेत त्यांना आध्यात्मिक राज्यासंबंधीच्या, अनेक नवीन तथ्यांचा एकामागून एक साक्षात्कार झाला होता. उदाहरणादाखल, वैदिक धर्मच घेऊ या. असं मानलं जातं की, वेद ऋषींनी रचले. हे ऋषी संत होते. संस्कृतमधील 'ऋषी' शब्दाचा नेमका अर्थ आहे, 'मंत्रा चा द्रष्टा.' हे मंत्र म्हणजे वेदातील ऋचांचा आशय आहेत. या ऋषींना म्हंटलंय की, त्यांना विशिष्ट सत्यांचा साक्षात्कार झाला आहे. त्यांनी ती प्रत्यक्ष अनुभवली आहेत. या इंद्रियातीत सत्यांच्या बाबतीत 'संवेदने' हा शब्द वापरता आला, तर 'आम्ही ती सत्ये संवेदली आहेत. त्यांची आम्हाला मूर्त संवेदना झाली आहे,' असे ते निश्चितपणे म्हणतात. नंतर त्यांनी आपले अनुभव वेदांच्या रूपाने लिहून ठेवले. यहुदी आणि ख्रिस्ती धर्मामध्येही याच सत्याचा उद्घोष झाल्याचे दिसून येते.

**पृ.११** बौद्ध धर्माच्या दक्षिण भारतातील शाखेच्या संबंधात या मुद्द्यावर काही आक्षेप घेतला जाणे शक्य आहे. बौद्ध लोकांचा ईश्वर अथवा आत्मा यावर विश्वास नाही, तर त्यांचा धर्मही अनुभवाच्या या अतींद्रीय अवस्थेतूनच निर्माण झाला, असं कसं म्हणता येईल? त्याचं उत्तर असं की, बौद्ध लोकांचाही एका शाश्वत नैतिक नियम-धर्मावर विश्वास आहे. त्यांचं धर्मज्ञान सामान्य तर्कावर

आधारलेलं नाही, तर बुद्धाला अतींद्रीय अवस्थेत त्याचा साक्षात्कार झाला होता. श्री. एडवीन अरनॉल्डने लिहिलेल्या 'आशियाचा नंदादीप' (द लाईट ऑफ एशिया) नावाच्या रसाळ काव्यात रेखाटलेल्या त्रोटक स्वरूपात का होईना; पण तुमच्यापैकी यांनी बुद्धदेवाचे चरित्र वाचले आहे, त्यांना आठवत असेल की, मनाची ती इंद्रियातीत अवस्था प्राप्त होईपर्यंत बुद्धदेव बोधिवृक्षाखाली आसनस्थ होऊन बसल्याचे वर्णन त्यात आहे. त्यांचे सारे विचार या अवस्थेतूनच निर्माण झाले आहेत. बौद्धिक चिंतनातून नव्हे.

अशा तऱ्हेने सर्वच धर्मीयांनी एक असा सिद्धांत प्रतिपादित केला आहे की, माणसाचं मन काही खास क्षणी केवळ इंद्रियांच्या सीमेपलीकडेच नव्हे, तर बुद्धीच्या शक्तीच्याही पलीकडे पोहोचते. त्या अवस्थेत त्याला अशा काही सत्यांचा साक्षात्कार होतो की, ज्याचं ज्ञान त्याला इंद्रियाद्वारे कधीही होऊ शकले नसते, वा तर्काद्वारेही होऊ शकले नसते. ही सत्येच जगातील सर्व धर्मांचा पाया आहेत. या सत्यांबद्दल शंका घेण्याचा आणि ती बुद्धीच्या कसोटीवर घासून बघण्याचा आपल्याला निश्चितपणे अधिकार आहे; पण जगातील सर्वच धर्मांचे असे म्हणणे आहे की, मनाला अशी काही अद्‌भुत शक्ती प्राप्त झाली आहे, की, यामुळे ते इंद्रियांच्या वा बुद्धीच्या पलीकडे जाऊ शकते. मानवी मनाची ही शक्ती म्हणजे सप्रमाण सिद्ध झालेली गोष्ट आहे, असे ते म्हणतात.

**पृ.१२** धर्माच्या या सगळ्या घोषणा कितपत खऱ्या आहेत, हा प्रश्न थोडा बाजूला ठेवला, तरी या सर्व धर्मांमध्ये एक समान गोष्ट दिसते. भौतिक शास्त्रांचे शोध मूर्त स्वरूपाचे असतात. त्याउलट धर्म ज्या सत्यांचा प्रचार करतो, ती अमूर्त स्वरूपाची असतात. सुसंघटित अशा सर्वच धर्मांमध्ये ही सत्ये शुद्ध, एकसंध व अमूर्त स्वरूपाची असतात. कुणी त्याला 'सर्वव्यापी पुरुष' म्हणतात. कुणी 'ईश्वरनामक अमूर्त व्यक्ती' म्हणतं. कुणी नैतिक नियम मानतात किंवा 'वस्तुमात्राला आधारभूत असलेले अमूर्त सत्  – तत्त्व म्हणतात. आधुनिक काळातही मनाची ही अतींद्रीय अवस्था वगळून यांनी धर्माचा प्रचार करण्याचा प्रयत्न केला, त्यांनादेखील जुन्या काळची ती अमूर्त तत्त्वे घेऊन, त्यांना 'नैतिक नियम', 'आदर्श एकत्व' यासारखी निरनिराळी नावे देऊनच आपले काम करावे लागले आहे. यावरून हेच दिसून येते की, ही अमूर्त सत्ये म्हणजे इंद्रियांनी प्रत्ययाला येणाऱ्या गोष्टी नव्हेत. ही तथ्ये इंद्रियगोचर नाहीत. आपल्यापैकी कुणीही कधीही 'आदर्श मानव' पाहिलेला नाही. तरीही त्यावर विश्वास ठेवायला आपल्याला

सांगितले जाते. आपल्यापैकी कुणीही आदर्शदृष्ट्याा परिपूर्ण माणूस बघितलेला नाही. तरीही, तसला आदर्श समोर असल्याखेरीज आपली उन्नत्तीही होणार नाही. याप्रमाणे निरनिराळ्या सगळ्या धर्मांमध्ये एक गोष्ट स्पष्टपणे आढळून येते की, हे धर्म सगुण ईश्वराच्या स्वरूपात म्हणा किंवा निर्गुण ब्रह्माच्या स्वरूपात म्हणा किंवा सारभूत अशा सत्तत्त्वाच्या स्वरूपात म्हणा, एक आदर्शभूत, एकसंध, एकरस अमूर्त तत्त्व आमच्या समोर ठेवत असतात. आपले काम म्हणजे त्या आदर्शापर्यंत पोहोचण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहणे. मानव कुणीही असो आणि कुठेही वसलेला असो, प्रत्येक मानवासमोर अनंत शक्तीचा एक आदर्श असतो. मानवासमोर अनंत सुखाचाही एक आदर्श असतो. आपल्या सभोवार दिसत असलेली बहुतांश कामे, सर्वत्र होत असलेले उद्योग, या अनंत शक्तीसाठी वा अपरिमित आनंदासाठी धडपडण्याच्या निमित्तानेच होत असतात. पण काही लोक असे असतात की, ज्यांच्या लवकरच लक्षात येते की, असीम शक्ती लाभावी, म्हणून जे प्रयास आपण करतो आहोत, ती शक्ती इंद्रियद्वारा प्राप्त करून घेता येणार नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले, तर त्यांना इंद्रियांच्या मर्यादांची जाणीव होते. त्यांच्या लक्षात येते की, सीमित शरीरद्वारा असीम आनंदाची, अनंताची प्राप्ती होऊ शकत नाही. दुसऱ्या शब्दात हे सांगायचे झाले, तर असे म्हणता येईल की, आमची इंद्रिये म्हणा, देह म्हणा, ही, त्या अनंताच्या अभिव्यक्तीचे माध्यम, यादृष्टीने फारच मर्यादित आहेत. सान्तामधून अनंत व्यक्त करणे अशक्य आहे, या सत्याचे ज्ञान त्याला कधी ना कधी होते आणि तो आपल्या सीमेच्या मर्यादेत असीम मिळवण्याचा प्रयत्न सोडून देतो. या प्रयत्नांचा त्याग हीच नीतीची पार्श्वभूमी असते. त्यागावरच नैतिकता आधारलेली असते. त्यागाचा पाया असल्याशिवाय कुठलेच नीतिनियम कधीच अस्तित्त्वात आले नाहीत.

**पृ.१३** नीतिशास्त्र नेहमीच म्हणते, 'मी नाही. तू.' या शास्त्राला म्हणायचे असते, मी नव्हे, माझ्याखेरीज इतर. नीतिशास्त्राचे म्हणणे असते की, असीम सामर्थ्य किंवा असीम आनंद प्राप्त करून घेण्यासाठी मनुष्य या निरर्थक 'स्व'ला कवटाळून बसलेला असतो, ती मिठी सोडायला हवी. दुसऱ्यांना पुढे करायला हवं आणि स्वत:ला मागे ठेवायला हवं. आपली इंद्रिये म्हणत असतात, 'आधी मी. मला पुढे जाऊ दे.' पण नीतिशास्त्र म्हणते, 'स्वत:ला सगळ्यात मागे ठेवा. अशा तऱ्हेने नीतिशास्त्राचे सगळे नियम त्यागावर आधारलेले आहेत. त्याची पहिली मागणी आहे, भौतिक पातळीवर आपल्या व्यक्तित्त्वाची आहुती द्या.